स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/ पोट निवडणुकीच्या कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या साहित्याच्या छपाई/खरेदीसंदर्भात अवलंब करावयाच्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शक सूचना...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ-२०२५/सा.ख.छ./प्र.क्र.६/का-१४
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
ई-मेल: sec-material@mah.gov.in
दिनांक:- २१ ऑगस्ट, २०२५

संदर्भ :- १) मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य, क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३५/२४/ निवडणूक-१२,यांचे दि.२७ मे, २०२५ रोजीचे पत्र. (प्रत संलग्न)
२) आयोगाचे क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५, दि.२६ जून, २०२५ रोजीचे आदेश. (प्रत संलग्न)
३) उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग- III/उद्योग-४, दि.०१ डिसेंबर, २०१६

**प्रस्तावना:-**

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा, ३३६ पंचायत समित्या व सुमारे १७०० ग्रामपंचायती या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच २९ महानगरपालिका, २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायती या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका (ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीसह) आगामी काळात होणार आहेत.

सदर निवडणुकांसाठी साहित्याची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासणार आहे. सदर साहित्याचे परिमाण निश्चित करणे, त्यासाठी आवश्यक प्रक्रिया राबविणे, उपलब्ध साहित्याचे वितरण करणे, मागील निवडणुकीतील शिल्लक सहित्य उपयोगात आणणे इत्यादी प्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे.

यासोबतच छपाई/खरेदी केलेल्या साहित्याच्या साठवणुकीकरिता जागेची अनुपलब्धता, साहित्याचे वितरण प्रक्रियेकरिता नियुक्त जिल्हा स्तरावरील कर्मचारीवृंदाच्या सेवा, त्यांचा प्रवास खर्च, साहित्य नियोजित ठिकाणी पोहोचविण्याकरिता होणारा वाहतूक खर्च, त्याकरिता लागणारा वेळ व श्रम कमी करून सदर प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक असल्याची बाब तसेच निवडणुकांकरिता अनावश्यक खर्च होऊ नये, याची दक्षता घेण्यासाठी सविस्तर सूचना देणे आवश्यक असल्याची बाब या कार्यालयाच्या निदर्शनास आली आहे.

तद्वतच राज्यात मोठ्या प्रमाणावर झालेले नागरीकरण, स्थानिक स्तरावर निवडणूक साहित्याची होत असलेली उपलब्धता व प्रशासकीय सुधारणेचा भाग म्हणून या प्रक्रियेच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. यापुढे राज्य निवडणूक आयोग खरेदी करीत असलेले तसेच सुरक्षेच्यादृष्टीने आवश्यक (सिलींग साहित्य) व अनुषंगिक साहित्य वगळता उर्वरित साहित्य स्थानिक स्तरावर म्हणजेच जिल्हा, यथास्थिती महानगरपालिका व तालुका पातळीवर खरेदी केल्यास वेळ, श्रम व खर्चात बचत होऊ शकते. सदरची बाब विचारात घेऊन, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका व पोटनिवडणुकांची प्रक्रिया राबविताना मतदान साहित्याची छपाई/ खरेदी व व्यवस्थापनासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सुधारित कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे:-

## परिपत्रक

**१) निवडणुकीकरिता आवश्यक साहित्याची यादी:-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकांची पूर्वतयारी करण्याकरिता, तसेच मतदान केंद्रांकरिता लागणाऱ्या मतदान साहित्याची यादी राज्य निवडणूक आयोगाकडील विविध पत्रान्वये तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या हस्तपुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आली आहे. या साहित्याची यादी सोबतच्या **"अ"** व **"ब"** प्रपत्रात नमूद करण्यात आली आहे. या यादीपैकी प्रपत्र **"अ"** मध्ये नमूद साहित्य राज्य निवडणूक आयोगामार्फत खरेदी किंवा छपाई करून संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच प्रपत्र **"ब"** मध्ये नमूद साहित्याची विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून खरेदी/ छपाई करून घेणे हे संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्तांमार्फत उपलब्ध करून घेण्यात यावी.

**२) निवडणूक साहित्याचे प्रमाण निश्चित करणे:-**

सदरच्या यादीमध्ये नमूद साहित्याचे प्रती मतदान केंद्र प्रमाण निश्चित करून देण्यात आले आहे. त्यानुसार त्या-त्या जिल्ह्यांनी, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरिता निश्चित करण्यात आलेले मतदान केंद्र विचारात घेण्यात यावे. प्रत्येक मतदान केंद्रासाठी नेमून दिलेल्या संख्येनुसार त्या वस्तुचे गुणाकार करून त्यात अधिक १० टक्के वाढ करण्यात यावी. यासोबतच जिल्हा पातळीवर व तहसिल पातळीवर या यादीपैकी व इतर आवश्यक साहित्याची गरज विचारात घेऊन त्या जिल्ह्यासाठी नेमके साहित्य त्याच्या परिमाणासह निश्चित करता येईल. हे साहित्य खरेदी करताना मागील

निवडणुकीमध्ये खरेदी करण्यात आलेले किंवा उपलब्ध असलेले वापरण्यायोग्य साहित्य शिल्लक असल्यास, त्याचा देखील विचार करण्यात यावा.

३. **निवडणूक साहित्य उपलब्ध करून घेणे:-**

निवडणुकांकरिता लागणारे साहित्य उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीच्या नियमपुस्तिकेसंदर्भात निर्गमित शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग- III/उद्योग-४, दि.०१/१२/२०१६ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती वापरुन खरेदी करण्यात यावे.

अ) **जिल्हाधिकारी:-** जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक ते प्रमाण निश्चित झाल्यानंतर लागणाऱ्या साहित्याची खरेदी करणे किंवा छपाई करण्याची प्रक्रिया वर नमूद कार्यपध्दतीचा अवलंब करून करण्यात यावी. सदर साहित्याबाबत संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, चर्नीरोड, मुंबई-४०० ००४ यांच्याकडे तसेच आपल्या जिल्ह्याच्या जवळ असलेल्या शासकीय मुद्रणालयामधून प्राधान्याने छपाई करून घेता येईल. तसेच शासकीय मुद्रणालयामधून सदरची छपाई करणे शक्य नसल्यास तसे प्रमाणपत्र शासकीय मुद्रणालयाकडून घेऊन, स्थानिक पातळीवरूनही करता येईल.

ब) **महानगरपालिका आयुक्त:-** महानगरपालिका निवडणुकीसाठी आवश्यक ते प्रमाण निश्चित झाल्यानंतर लागणाऱ्या साहित्याची खरेदी करणे किंवा छपाई करण्याची प्रक्रिया प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करून ज्या महानगरपालिकांची स्वत:ची प्रिंटींग प्रेस असल्यास, निवडणुकीचे छपाईचे साहित्य त्यांच्या स्वत:च्या प्रेसमधून छपाई करून घेता येईल. सदरची सोय उपलब्ध नसल्यास, स्थानिक पातळीवरूनही करता येईल.

४) निधीची उपलब्धता:-

अ) **राज्य निवडणूक आयोग:-** राज्य निवडणूक आयोगामार्फत करण्यात येणाऱ्या साहित्याची खरेदी अथवा छपाई यावरील खर्च हा त्या-त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी आयोगास उपलब्ध करून दिलेल्या अंशदानाच्या निधीतून करण्यात येतो. तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लागणाऱ्या साहित्याचा खर्च ग्राम विकास विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीतून भागविला जातो. राज्य निवडणूक आयोगाकडून उपलब्ध करून

देण्यात येणाऱ्या साहित्यामध्ये प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (EVM) व त्यांच्याशी निगडित बाबी जसे की, पॉवर पॅक (बॅटरी), मेमरी (DMM), पेपर सील, पट्टी सील, स्पेशल टॅग इ. सिलींग साहित्य तसेच मार्कर पेन, मेटल सील इत्यादी **(प्रपत्र-अ)** मध्ये नमूद केलेल्या साहित्याचा समावेश होतो.

ब) **जिल्हाधिकारी:-** संबंधित जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी लागणाऱ्या साहित्याचा खर्च ग्राम विकास विभागामार्फत उपलब्ध करून दिलेल्या निधीतून भागविणे आवश्यक असते. हा खर्च करताना ग्राम विकास विभागाने ठरवून दिलेले निकष व कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करणे आवश्यक असेल.

जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायती या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी लागणाऱ्या साहित्यावरील खर्च त्या-त्या नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्याकडील उपलब्ध तरतूदीमधून किंवा आवश्यकतेप्रमाणे नगरविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या निधीतून भागविण्यात यावा.

क) **महानगरपालिका आयुक्त:-** राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी लागणाऱ्या साहित्याचा खर्च त्या-त्या महानगरपालिकेकडील निधीतून भागविण्यात यावा.

५. **लोकसभा/ विधानसभा निवडणूक- २०२४ साठी निश्चित केलेले दर संदर्भासाठी वापरणेबाबत:-**

सन २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वेळेस मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी विहीत प्रक्रियेचा अवलंब करुन काही साहीत्याचे दर निश्चित करुन ते क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३५/२४/निवडणूक-१२, **दि.२७ मे, २०२५** अन्वये सर्व संबंधितांना कळविले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. सदर पत्रात नमूद दर व विहित प्रक्रियेचा अवलंब करून आपणांस प्राप्त झालेले दर याची तुलना करण्याकरिता वापरता येईल, जेणेकरून सदर साहित्य किफायतशीर दराने, योग्य प्रतीचे व वापरण्यायोग्य असे उपलब्ध होऊ शकेल. तथापि, येथे असेही स्पष्ट करण्यात येते की, सदर पत्रामध्ये नमूद असलेल्या पुरवठादारांकडून खरेदी करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून कोणताही आग्रह नाही.

६. इतर मार्गदर्शक सूचना:-

i. निवडणूक विषयक साहित्याची खरेदी करतांना, जिल्हाधिकारी, महानगरपालिका व नगरपरिषदा/ नगरपंचायत यांच्या कार्यालयांनी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या उपरोक्त

खरेदी नियम पुस्तिकेनुसार विहीत केलेल्या खरेदी पध्दतीचा अवलंब करुन साहित्य खरेदी प्रक्रिया राबवावी.

ii. मतदान प्रक्रियेतील शिल्लक साहित्याचा विनियोग प्राथम्याने नजिकच्या कालावधीतील सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी करण्यात यावा. तथापि, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राशी संबंधित साहित्य व दीर्घ कालावधीसाठी अभिरक्षित करावयाच्या साहित्याव्यतिरिक्त ज्या साहित्याचा विनियोग नियोजित निवडणुकांकरिता करता येणे शक्य नाही, तसेच जे साहित्य दैनंदीन कार्यालयीन कामकाजाकरिता उपयोगात आणणे शक्य आहे, असे साहित्य (प्रपत्र-ब) जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांचे स्तरावरुन त्यांचे अधिनस्त शासकीय कार्यालयांना कार्यालयीन वापराकरिता उपलब्ध करून द्यावे.

iii. सर्व जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी वापरण्यात येणारे नमुने (Forms for actual voting day) व प्रकाशन नमुने (Publication form) वगळता इतर मतदान कामकाज प्रक्रियेशी संबंधित विविध नमुन्याच्या संगणकीय प्रती (Soft Copy) तयार करुन आवश्यकतेनुसार ती संबंधितांना त्या-त्या वेळी भरण्यास उपलब्ध करुन द्याव्यात.

iv. सर्व जिल्हाधिकारी, सर्व महानगरपालिका आयुक्त व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगरपंचायती यांनी राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असलेले सर्व अधिकारी/कर्मचारी यांना निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याच्यादृष्टीने निवडणूक कामकाजासंबंधित प्रकाशन करण्यात आलेल्या विविध माहिती पुस्तिका, निर्देश पुस्तिका, तपासणी सूची व नियम पुस्तिकांच्या पीडीएफ (PDF) प्रती अथवा त्यांचे दुवे (Link) आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात यावेत व शक्यतो डिजिटल स्वरुपातील पुस्तकांचा वापर करण्यात यावा.

v. पुस्तक छपाई आवश्यकच असल्यास, त्या पुस्तकांच्या बाबतीत सर्व संबंधित कार्यालयांनी निवडणूक कामकाजासंबंधित प्रकाशित करण्यात आलेल्या विविध माहिती पुस्तिका, निर्देश पुस्तिका, तपासणी सूची व नियम पुस्तिका यांची आवश्यक मागणी व त्यामधून शिल्लक साठा वजा करुन उर्वरित पुस्तकांची स्थानिक शासकीय मुद्रणालयांकडून अथवा महानगरपालिका मुद्रणालयाकडून छपाई करुन घ्यावी. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास अडचण असल्यास,

स्थानिक मुद्रणालयाकडून पुस्तकांचे मुद्रण करुन घेण्यास हरकत नाही. तथापि, छपाई करतांना छपाईकरिता येणारा खर्च हा पुस्तकाच्या छायाप्रतीसाठी येणाऱ्या खर्चापेक्षा कमी असला पाहिजे. पुस्तकाच्या छपाईवरील खर्च त्यांच्या छायांकित प्रती काढण्यापेक्षा अधिक होत असल्यास, पुस्तकांची छपाई न करता त्यांच्या छायांकित प्रती काढण्यात याव्यात.

७. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/ पोट निवडणुकीच्या कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या साहित्याच्या छपाई/खरेदीसंदर्भातील कार्यपद्धतीबाबत व शासकीय काटकसरीचे धोरण अवलंबून शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीचा योग्य वापर करण्याच्या अनुषंगाने सदरच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी) २७.०८.२०२१
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
३. सर्व महानगरपालिका आयुक्त
४. सर्व नगरपरिषदा/नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
६. निवड नस्ती.

| प्रपत्र-अ | | |
|---|---|---|
| राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाकडून पुरविण्यात येणाऱ्या मतदान साहित्याची माहिती | | |
| अ.क्र. | साहित्याचा तपशील | प्रति मतदान केंद्र संख्या |
| १ | २ | ३ |
| १ | कंट्रोल युनिट मेमरीसह | १ |
| २ | बॅलेट युनिट्स (उमेदवारांच्या संख्येवर अवलंबून) | २ |
| ३ | पॉवर पॅक (कंट्रोल युनिटच्या संख्येनुसार)<br>(१) नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सध्याच्या निवडणुकांकरिता आयोगाकडून पुरवठा केला जाईल.<br>(२) मात्र अतिरिक्त पॉवर पॅक उपलब्ध करून घेण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी मे. ईसीआयएल, हैदराबाद या कंपनीकडून आवश्यकतेनुसार खरेदी करता येईल. | १ |
| ४ | मार्कर पेन<br>(१) नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सध्याच्या निवडणुकांकरिता आयोगाकडून पुरवठा केला जाईल.<br>(२) मात्र अतिरिक्त मार्कर पेन उपलब्ध करून घेण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी मे. कोरस (इंडिया) लि. मुंबई या कंपनीकडून आवश्यकतेनुसार खरेदी करता येईल. | २ |
| ५ | मतदान केंद्राध्यक्षासाठी धातुची मोहोर (मेटल सील) | १ |
| ६ | स्पेशल टॅग | ३ |
| ७ | पेपर सील | ३ |
| ८ | पट्टी सील | ३ |

## प्रपत्र-ब

### राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणुका सन २०२५

### मतदान केंद्रावर लागणारे निवडणूक साहित्य जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी स्थानिक पातळीवर छपाई/ खरेदी करणे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | प्रति मतदान केद्र संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | (i) छपाई करुन घेण्यात येणारे साहित्य | |
| १ | मतदारांची नोंदवही ( नमुना व्हीएम-१ ) | १ |
| २ | मतदार स्लीप (मतदारांच्या संख्येवर अवलंबून) | ८०० ते १००० |
| ३ | मतदार यादीच्या कार्यप्रती | ३ |
| ४ | मतपत्रिका ( प्रदत्त मतांसाठी ) | २० |
| ५ | मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी | १ |
| ६ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी | १ |
| ७ | आक्षेपित मतांची यादी | २ |
| ८ | अंध व अपंग मतदारांची यादी ( नमुना व्हीएम-५) | २ |
| ९ | प्रदत्त मतांची यादी ( नमुना व्हीएम-२) | २ |
| १० | नोंद झालेल्या मतांचा हिशोब (नमुना व्हीएम-३-भाग-१) | १० |
| ११ | वापरण्यात आलेल्या कागदी मोहोरांचा अभिलेख | २ |
| १२ | आक्षेपित मतांची फी जमा करण्यासाठी पावती पुस्तक | १ |
| १३ | पोलिस ठाणे अंमलदाराला पत्र | ४ |
| १४ | मतदान केंद्राध्यक्षाद्वारे करण्यात येणारी घोषणापत्रे मतदान सुरू होण्यापूर्वी, मतदान संपल्यावर, दुसरे मतदान यंत्र सील करताना | २ |
| १५ | मतदारांना त्यांच्या वयाविषयी घोषणापत्र करण्यासाठी फॉर्म | २ |
| १६ | घोषणापत्र दिल्यानंतर मतदान करण्यासाठी दिलेल्या/ वयाविषयी घोषणापत्र देण्यास नकार दिलेल्या मतदारंची यादी | २ |
| १७ | अंध व विकलांग मतदारांच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र | ४ |
| १८ | मतदान प्रतिनिधींसाठी पासेस | १० |
| | (ii) छपाई करुन घेण्यात येणारे लिफाफे | |
| १ | लहान लिफाफयांकरीता (सांविधिक लिफाफे ) ( एस.ई.८ ) | १ |
| २ | मतदार यादीच्या इतर प्रतीसाठी ( एसई-८ ) | १ |
| ३ | मतदार यादीच्या इतर प्रतीसाठी ( एसई-८ ) | १ |
| ४ | प्रदत्त मतदानपत्रिका व प्रदत्त मतदाराच्या यादीसाठी | १ |
| ५ | मतदान सुरु होण्यापूर्वी व मतदान संपल्यावर मतदान केंद्राध्यक्षाद्वारे करण्यात येणाऱ्या घोषणापत्र करिता ( एसई-७ ) | १ |
| ६ | नोंद केलेल्या मतांच्या हिशोबासाठी ( नमुना व्हीएम-३ ) ( एसई-५) | २ |
| ७ | आक्षेपित मतांच्या यादीसाठी ( एसई-७ ) | १ |
| ८ | न वापरलेल्या व खराब झालेल्या कागदी मोहोरांसाठी ( एसई-५) | १ |
| ९ | मतदान प्रतिनिधींच्या नेमणूक पत्रांसाठी ( एसई-६) | १ |
| १० | अंध व विकलांग मतदारांच्या यादीसाठी ( एसई-५) | १ |
| ११ | मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीच्या अहवालाकरीता ( एसई-६) | १ |
| १२ | निवडणूक कार्य प्रमाणपत्राकरीता ( एसई-५) | १ |
| १३ | पावती पुस्तके व समपहरण केलेल्या रकमेसाठी ( एसई-६) | १ |

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | प्रति मतदान केंद्र संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १४ | सहकाऱ्याच्या घोषणापत्रासाठी ( एसई-५) | १ |
| १५ | लहान लिफाफे ( इतर ) ( एसई-७ ) | १ |
| १६ | मतदारांची स्वाक्षरी असलेल्या मतदारांच्या नोंदवहीकरीता (नमुना व्हीएम-१) (एसई ) | १ |
| १७ | इतर संबंधित कागदपत्रासाठी ( एसई-५) | १ |
| १८ | लहान लिफाफे ( एसई-८ ) | १ |
| १९ | केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीकरीता लिफाफा ( एसई-५) | १ |
| २० | कोरे लिफाफे ( एसई-५)-२ | २ |
| २१ | कोरे लिफाफे ( एसई-८)-३ | ३ |
| २२ | न वापरलेल्या मतपत्रिकांसाठी ( एसई-७ ) | १ |
| २३ | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, मोहोरबंद असलेल्या लिफाफयामध्ये अन्य कोणतेही पेपर ठेवण्याचे ठरविले आहे, त्यासाठी | १ |
| २४ | न वापरलेल्या व खराब झालेल्या विशेष टॅगसाठी लिफाफा ( एसई-७ ) | १ |
| २५ | न वापरलेल्या/खराब पट्टीसीलसाठी ( स्ट्रीप सील ) लिफाफा ( एसई-७ ) | १ |
| २६ | मतदार स्लीप्स ठेवण्याकरीता ( एसई-७) | १ |
| | **(iii) खरेदी करण्यात येणारे साहित्य** | |
| १ | बाणफुली चिन्ह असलेला रबरी शिक्का | १ |
| २ | शाई असलेले पॅड ( जांभळी ) | १ |
| ३ | आगपेटी | १ |
| ४ | विभेदक चिन्ह असलेला रबरी शिक्का | १ |
| ५ | साधी पेन्सिल -१ | १ |
| ६ | बॉलपेन निळे -३ | ३ |
| ७ | बॉलपेन लाल - १ | १ |
| ८ | कोरे कागद ८ मोठे तुकडे ( शिट्स ) | ८ |
| ९ | टाचण्या ( पीन्स् ) २५ नग | २५ |
| १० | लाख - ६ कांडया | ६ |
| ११ | मतदान कक्षासाठी साहित्य - २+२=४ | ४ |
| १२ | डिंक (गम पेस्ट )१ बाटली | १ |
| १३ | ब्लेड-१ | १ |
| १४ | मेणबत्या -४ | ४ |
| १५ | धातूची पट्टी-१ | १ |
| १६ | जाड दोरा ( Thin twine Thread) २० मीटर | १ |
| १७ | कार्बन पेपर-३ | ३ |
| १८ | पॅकेजिंग कागद- २ शीट | २ |
| १९ | तेल इत्यादी पुसण्यासाठी कापड किंवा चिंधी- ३ | ३ |
| २० | ड्रॉईंग पिन - २४ नग | २४ |
| २१ | पडताळणी सूची- २ | २ |
| २२ | रबर बॅन्डस-२० | २० |
| २३ | सेलोटेप-१ | १ |
| २४ | मतदान साहित्य ठेवण्यासाठी पिशवी | १ |

आ.क्र. ५४/का.१४
३०/०५/२०२५

८८

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

निवडणूक प्राथम्य/कालमर्यादा

क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३५/२४/निवडणूक-१२
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मे, २०२५

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,

**विषय** :- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय स्तरावरुन तसेच मुख्य संचालक, शासन मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई यांचेमार्फत राबविण्यात आलेल्या खरेदीप्रक्रियेबाबत.

**संदर्भ** :- या कार्यालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दिनांक ०३.०२.२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकांच्या कामकाजा दरम्यान विविध मतदान साहित्याकरिता खरेदीप्रक्रिया राबवितांना आलेल्या अनुभवास अनुसरुन, आगामी लोकसभा, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक व पोटनिवडणूकीच्या कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या साहित्याच्या खरेदीसंदर्भात अवलंब करावयाच्या कार्यपध्दतीबाबत सूचना संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भाधीन परिपत्रकानुसार, यापुढे निवडणूक साहित्यप्रक्रिया क्षेत्रिय स्तरावरुन राबविण्याचे निदेश आहेत. सबब, या कार्यालयाकडून विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता करण्यात आलेल्या निवडणूक साहित्य खरेदीबाबतची सविस्तर माहिती (उदा. पुरवठादाराचे नांव/ संपर्क क्रमांक / साहित्याकरिता प्राप्त निम्नतम दर इत्यादी) भविष्यातील निवडणूकांदरम्यान खरेदीप्रक्रिया राबवितांना मार्गदर्शक ठरुन, निवडणूकीचे संचलन करण्यास उपयुक्त ठरेल. करिता सदर माहिती संलग्न करुन यासोबत पाठविण्यात येत आहे.

तथापि, पुरवठादारांची नांवे फक्त माहितीस्तव कळविण्यात येत आहेत. खरेदी प्रक्रिया राबवितांना खरेदीची विहीत प्रक्रिया राबविणे अभिप्रेत असून, या पत्रासोबत देण्यात आलेल्या यादीतील पुरवठादारांना प्राधान्य देणे अभिप्रेत नाही, ही बाब विवक्षित निदर्शनास आणण्यात येत आहे.

आपला,

(विक्रम निकम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत: वरीलप्रमाणे.

प्रत :

१.सर्व उपजिल्हाधिकारी व उप जिल्हा निवडणूक अधिकारी
२:संचालक, शासन मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई
३.व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई
४.निवडनस्ती.

## विवरणपत्र -१

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ करिता मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत तसेच संचालक, शासन मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई यांचे कार्यालयाकडून विहीत निविदा प्रक्रिये द्वारे खरेदी करण्यात आलेले साहित्य व प्राप्त निम्नतम दर.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | प्राप्त निम्नतम दर (GST सह) |
|---|---|---|
| १. | लाकडी हॅंडलसह धातूचा शिक्का (Brass Metal Seal) | रु.३४.८१ प्रती नग |
| २. | अभिरुप मतदान चिठ्ठी शिक्का (Mock Poll Slip Stamp) | रु.१६.०५ प्रती नग |
| ३. | स्पेशल टॅग (Special Tags) | रु.०.७५ प्रती नग |
| ४. | बॅकपॅक (Backpack) | |
| | CU | रु.२२८०/- प्रती नग |
| | VVPAT | रु.२५२०/- प्रती नग |
| ५. | मतदान कक्ष (Voting Compartment) | |
| | २ BU | रु.१४२/- प्रती नग |
| | ३ BU | रु.१७०/- प्रती नग |
| ६. | ब्रेल मतपत्रिका (Brail Voter Slip) | रु.११/- छपाई प्रती नग |
| ७. | धातुची पट्टी (Metal Rule) | रु.१४.८०/- प्रती नग |
| ८. | शाई असलेले पॅड (जांभळे) | रु.१९.६२/- प्रती नग |
| ९. | साधी पेन्सील | रु.२.२८/- प्रती नग |
| १०. | बॉल पेन | |
| | निळा, | रु.२.७४/- प्रती नग |
| | लाल, | रु.२.७१/- प्रती नग |
| | रुपेरी | रु.९.९०/- प्रती नग |
| ११. | डिंक (Gum Paste) (६० मि.ली.) | रु.८.९६/-प्रती नग |
| १२. | टाचण्या ( Pins) | रु.१३.५०/- प्रती २५ नग |
| १३. | पारदर्शक चिकटपट्टी (Transparent Adhesive Tape) | रु.१९.९७/- प्रती नग |
| १४. | स्पॅंज पेटी (Sponges With Box) | रु.६.७५/- प्रती नग |
| १५. | ब्लेड विथ रेझीन कव्हर | रु.९.८५/- प्रती नग |
| १६. | थीन ट्राईन थ्रेड | रु.१५.००/- प्रती नग |
| १७. | कार्बन पेपर | रु.१८५/- प्रती पॅकेट |
| १८. | ड्रॉईंग पीन (बॉक्स विथ २४ नग) | रु.१३.००/- |

१.लाकडी हँडलसह धातूचा शिक्का (Brass Metal Seal) :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | रुद्र एंटरप्राईजेस, १८/८८, सरई मानसिंग, अलीगड २०२ ००१, (उत्तरप्रदेश) भ्रमणध्वनी : ९४१००६०४७६. |
| २. | युनिर्व्हसल ट्रेड लिंक, ११७ ए, ऑफीस क्र.५, तळमजला, जैन गृह उद्योग बिल्डींग, माधवबाग मंदीरजवळ, मुंबई ००४. भ्रमणध्वनी : ७०२१७२७४१३ |
| ३. | साईकृष्णा सेल्स, गांधी मार्केट, लातूर ४१३ ५१२. भ्रमणध्वनी : ९२०९९९५९९९ |
| ४. | श्रीकृष्णा एंटरप्राईजेस, ५७, हुडको कॉलनी, लातूर ४१३ ५१२. भ्रमणध्वनी : ९८९०५८८६६८ |
| ५. | इमेज डिजीटल ग्राफीक्स, के ई ६, कबीर मार्ग, बानी पार्क,जयपूर ३०२ ०१६. (राजस्थान) भ्रमणध्वनी : ९६३६२९७३६१ |
| ६. | अंबिका स्टेशनरी अँड कंपनी, ३/गोपाल निवास, आझाद रोड, अंधेरी, मुंबई ४०० ०९२. |
| ७. | एकेडीसी गृप आणि कंपनी, ४०२, सीटीएस क्र.६९४ व ६९७, आशानगर, ठाकुर कॉम्प्लेक्स, कांदिवली, मुंबई ४०० १०१. भ्रमणध्वनी : ७६६६७०६६६९ |
| ८. | जय अंजनी एंटरप्राईजेस, शॉप नं.५, हनुमाननगर, चकाला नाका, ए.के.रोड, अंधेरी, मुंबई ४०० ०९३ भ्रमणध्वनी : ९७७३२५००८७ |
| ९. | आर के एंटरप्राईजेस, रु.नं.१०, दुसरा मजला, अहमदअली हाऊस क्र.७, मोदी रोड, फोर्ट, मुंबई १. भ्रमणध्वनी : ८८७९७३५७२० |
| १०. | विनायक एंटरप्राईजेस, त्रिपाठी बिल्डिंग, तळमजला, २४५, बाझारगेट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९९२०९३७२७७ |
| ११. | अमर ट्रेडिंग कंपनी, सराई काबा, तुर्कमान गेट, अलिगड २०२ ००१. (उत्तरप्रदेश) भ्रमणध्वनी : ९४१२८२१४८१, ८२१८२८७२८८ |

२. अभिरुप मतदान चिठ्ठी शिक्का (Mock Poll Slip Stamp):

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | इमेज डिजीटल ग्राफीक्स, के ई ६, कबीर मार्ग, बानी पार्क,जयपूर ३०२ ०१६. (राजस्थान) भ्रमणध्वनी : ९६३६२९७३६१ |
| २. | युनिर्व्हरसल ट्रेड लिंक, ११७ ए, ऑफीस क्र.५, तळमजला, जैन गृह उद्योग बिल्डींग, माधवबाग मंदीरजवळ, मुंबई ४. भ्रमणध्वनी : ७०२१७२७४१३ |
| ३. | साईकृष्णा सेल्स, गांधी मार्केट, लातूर ४१३ ५१२. भ्रमणध्वनी : ९२०९९९५९९९ |
| ४. | श्रीकृष्णा एंटरप्राईजेस, ५७, हुडको कॉलनी, लातूर ४१३ ५१२. भ्रमणध्वनी : ९८९०५८८६६८ |
| ५. | अंबिका स्टेशनरी अँड कंपनी, ३/गोपाल निवास, आझाद रोड, अंधेरी, मुंबई ०९२ |
| ६. | एकेडीसी गृप आणि कंपनी, ४०२, सीटीएस क्र.६९४ व ६९७, आशानगर, ठाकुर कॉम्प्लेक्स, कांदिवली, मुंबई ४०० १०१. भ्रमणध्वनी : ७६६६७०६६६९ |
| ७. | जय अंजनी एंटरप्राईजेस, शॉप नं.५, हनुमान नगर, चकाला नाका, ए.के. रोड, अंधेरी मुंबई ४०० ०९३ भ्रमणध्वनी : ९७७३२५००८७ |
| ८. | विनायक एंटरप्राईजेस, त्रिपाठी बिल्डिंग, तळमजला, २४५, बाझारगेट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९९२०९३७२७७ |
| ९. | आर के एंटरप्राईजेस, रु.नं.१०, दुसरा मजला, अहमदअली हाऊस क्र.७, मोदी रोड, फोर्ट, मुंबई १.भ्रमण ध्वनी : ८८७९७३५७२० |

३. स्पेशल टॅग (Special Tags):

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १ | प्रमुख नियंत्रक जिल्हा परिषद मुद्रणालय, सांगली, सांगली मिरज रोड, जिल्हा परिषद, कंपाउंड, सांगली मिरज, सांगली – ४१६ ४१६. दुरध्वनी : ०२३३-२३७५४१८. |
| २ | सुधा ऑफसेट प्रिंटर्स ४०४, रणखांबे बिल्डीग, खणभाग, सांगली, सांगली मिरज कुपवाड (महानगरपालिका) मिरज, सांगली – ४१६ ४१६. भ्रमणध्वनी : ८६६८९४३०११ |
| ३ | शिवानी क्रिएशन्स, डी-६६, अमरवाडी, १ ली खट्टर गल्ली, सी.पी. टँक, मुंबई – ४०० ००४. दुरध्वनी :२३८८१५७२ |
| ४ | वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला बिल्डिंग, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई – ४००००१. भ्रमणध्वनी : ९८२०८०११५९ दुरध्वनी : २२६९१७७८, २२७००६६३ |
| ५ | युनिव्हर्सल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन उद्योग गृह इमारत, ११७-ए, सी.पी. टँक रोड, मुंबई – ४०० ००४. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१. |

४.बॅकपॅक (Backpack) :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | सुकान मार्केटींग, प्लॉट क्र.५९२, फ्लॅट क्र.१२, अनिल व्हीला, २ रा मजला, जेम जमशेज रोड, माटुंग (पूर्व), मुंबई ४०० ०१९. भ्रमणध्वनी : ९९२०३६८९८१, दुरध्वनी : २४१७५६३० |
| २. | अरिहंत एंटरप्राईजेस, ११ सी, निकडवारी मार्ग, तळ मजला, खोताची वाडी, जैन क्लिनिक मागे, गिरगांव, मुंबई ४०० ००४. भ्रमणध्वनी : ९८२१०२१३९१ |
| ३. | मनिष ट्रेडिंग कॉर्पोरेशन, २७६, ताडदेव रोड, ३, मातृमंदिर, चौथा मजला, मुंबई ४०० ००७. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| ४. | बीझक्राफ्ट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, ३०६-३१२, ३ रा मजला, ५ युनीट्स बिल्डिंग, EIA, अस्मिता टेक्सटाईल पार्क, एम.आय.डी.सी, भिवंडी, जि.ठाणे. भ्रमणध्वनी ९९८७८७७७१४ |

५. मतदान कक्ष (Voting Compartment) :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | श्री सोमनाथ ऑफसेट, सोमनाथ इंडस्ट्रीअल पार्क, बगोदरा, ता. बावला, जि. अहमदाबाद ३६४००४ (गुजरात) भ्रमणध्वनी : ९८२४२०६५३३ |
| २. | श्याम इंजिनिअरींग, टी ०४, ०५, हार्मनी बिल्डिंग, नरिमन नगर, जयपूर ३०२०१९. (राज्यस्थान) भ्रमणध्वनी : ९५८७२२२६६१ |

६.ब्रेल मतपत्रिका (Brail Voter Slip) :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | Nawph Braille Press, Near SGB Amravati University, Mardi Road, Amravati. Mobile No. 9370182889, 9421742376, 9975311853 |
| २. | The Blind Welfare Organisation, Suyojit Ratan Mall, ३rd floor, Opposite Nehru Garden, Nashik , Mobile No. 9822900717 |

७. धातुची पट्टी (Metal Rule) :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पावंवाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९८२०८०११५९ |
| २. | मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९ |
| ३. | मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ४. | मे. महादेव स्टेशनरी, ३१०, डी विंग, कंकैया, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९७६९४३३३६३ |
| ५. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| ६. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |
| ७. | मे. जान्हवी इंम्पेक्स, २४३, २ मजला, फाखी मंझील, बाजारगेट मार्ग, फोट, मुंबई ४०० ००१. |

८. शाई असलेले पॅड :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. स्टॅंडर्ड टेक्नोलॉजिस,१८ वा मजला, नॉर्थ वेस्ट ए, सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८. भ्रमणध्वनी : ९८२०९९८००० |
| २. | मे. महादेव स्टेशनरी, ३१०, डी विंग, कंकैया, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९७६९४३३३६३ |
| ३. | मे. महावीर इंडस्ट्रिज,जी-५५, सी-३, महावीर नगर, शंकर मार्ग, कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७. भ्रमणध्वनी : ९८५०९१९९७१. |
| ४. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| ५. | मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ६. | मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ७. | मे. युनिर्व्हसल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टॅंक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१ |
| ८. | मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९८२०८०११५९ |
| ९. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |

९. साधी पेन्सील (Ordinary Pencil) :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. राशी ट्रेडर्स, जी-५५, सी-३, महावीर नगर, जैन सोसायटी, कांदिवली पश्चिम मुंबई ४०० ०६७ भ्रमणध्वनी : ९९३०६४४५८० |
| २. | मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ३. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| ४. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |
| ५. | मे. युनिर्व्हसल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टॅंक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१ |
| ६. | मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१ भ्रमणध्वनी ९८२०८०११५९ |

१०. अ.बॉलपेन (Blue) :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| २. | मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ३. | मे. राशी ट्रेडर्स, जी-५५, सी-३, महावीर नगर, जैन सोसायटी, कांदिवली पश्चिम मुंबई ४०० ०६७ भ्रमणध्वनी : ९९३०६४४५८० |
| ४. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |
| ५. | मे. युनिर्व्हसल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टॅंक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१ |
| ६. | मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९८२०८०११५९ |

१०. ब.लाल बॉलपेन (Red) :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. राशी ट्रेडर्स, जी-५५, सी-३, महावीर नगर, जैन सोसायटी, कांदिवली पश्चिम मुंबई ४०० ०६७ भ्रमणध्वनी : ९९३०६४४५८० |
| २. | मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ३. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| ४. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |
| ५. | मे. युनिर्व्हसल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टॅंक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१ |
| ६. | मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९८२०८०११५९ |

१०. क.सिल्व्हर बॉलपेन (Silver):

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. युनिर्व्हसल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टॅंक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१ |
| २. | मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ३. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| ४. | मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ५. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |
| ६. | मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९ |

११. डिंक (Gum Paste)

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१ भ्रमणध्वनी ९८२०८०११५९ |
| २. | मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ३. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| ४. | मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ५. | मे. शिवानी क्रिएशन, डी ६६, २ रा मजला, अमरवाडी, पहिली खत्तरगल्ली, सी.पी.टॅंक, मुंबई ४०० ००४ भ्रमणध्वनी : ९३२०४७१०८० |
| ६. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |
| ७. | मे. युनिर्व्हसल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टॅंक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१ |
| ८. | मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९ |

१२. टाचण्या (Paper Pins) :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१ भ्रमणध्वनी ९८२०८०११५९ |
| २. | मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ३. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |

| | |
|---|---|
| ४. | मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ५. | मे. शिवानी क्रिएशन, डी ६६, २ रा मजला, अमरवाडी, पहिली खत्तरगल्ली, सी.पी.टॅंक, मुंबई ४०० ००४ भ्रमणध्वनी : ९३२०४७१०८० |
| ६. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |
| ७. | मे. युनिर्व्हसल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टॅंक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१ |
| ८. | मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९ |

१३. पारदर्शक चिकटपट्टी (Transparant Adhesive Tape)

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. ए —झेड ऑफीस सप्लायर्स, २९/१५, सुभेदार हुसैन स्ट्रीट, रॉयपीठ, चेन्नई ६०० ०१४. भ्रमणध्वनी : ८१२२२२९९८८ |
| २. | मे.ब्लेसिंग एंटरप्राईजेस, ३५९६, तळ मजला, केसुरवाले, पहारगंज, दिल्ली -९, भ्रमणध्वनी ९२५०५३८५९८. |
| ३. | मे.डी.जे. एंटरप्राईजेस, १०९/११७, सी.पी. टॅंक रोड, २७, मोतीशाँ जैन बिल्डिंग, ३ रा मजला, माधवबाग मंदिर, मुंबई ४०० ००४. भ्रमणध्वनी : ८६००९७८०५३. |
| ४. | मे.हसमुख पेपर मार्ट, ६४, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१, भ्रमणध्वनी : ९३२२२३७१८२ |
| ५. | मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९ |
| ६. | मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ७. | मे. न्यु सेंच्युरी फिलामेंट्स, सी-१, २१९/२, जी.आय.डी.सी., वाघोडीया, जि. वडोदरा ३९१ ७६० गुजरात. भ्रमणध्वनी : ९९७९९५३७८६. |
| ८. | मे. सिंत्रॉन पॉलिमर प्रा. लि., प्लॉट क्र.जी-२८०४, रोड १० ए, जी.आय.डी.सी., लोधीका, जि. राजकोट ३६००२७ गुजरात. भ्रमणध्वनी : ९९७९९५३७८६ |
| ९. | मे. युनिर्व्हसल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टॅंक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१ |

१४.स्पाँज पेटी (Sponges with box):

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे.हसमुख पेपर मार्ट, ६४, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१, भ्रमणध्वनी : ९३२२२३७१८२ |
| २. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| ३. | मे. राशी ट्रेडर्स, जी-५५, सी-३, महावीर नगर, जैन सोसायटी, कांदिवली पश्चिम मुंबई ४०० ०६७ भ्रमणध्वनी : ९९३०६४४५८० |
| ४. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |
| ५. | मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१ भ्रमणध्वनी ९८२०८०११५९ |

१५. ब्लेड विथ रेझीन कव्हर (Blade with rasin cover)

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| २. | मे. फतेह इंडस्ट्रिज, मोदी चेंबर्स, ३१९, तळमजला, नरसी नथ्या रोड, मस्जित रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई ४०० ००९. भ्रमणध्वनी : ९८२००३४२५४ |
| ३. | मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९ |
| ४. | मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ५. | मे. महादेव स्टेशनरी, ३१०, डी विंग, कंकैया, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९७६९४३३३६३ |
| ६. | मे.अल अक्सा केमिकल्स, वॉर क्र.१९, २६४ बाग्लाघाट, झांशी, उत्तरप्रदेश २८४ ००२. भ्रमणध्वनी : ८११२४४९००० |
| ७. | मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ८. | मे. शिवानी क्रिएशन, डी ६६, २ रा मजला, अमरवाडी, पहिली खत्तरगल्ली, सी.पी.टँक, मुंबई ४०० ००४ भ्रमणध्वनी : ९३२०४७१०८० |
| ९. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |

१६. थीन ट्रॉईन थ्रेड (Thin Twine Thread)

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे.हसमुख पेपर मार्ट, ६४, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१, भ्रमणध्वनी : ९३२२२३७१८२ |
| २. | मे.ब्लेसिंग एंटरप्राईजेस, ३५९६, तळ मजला, केसुरवाले, पहारगंज, दिल्ली -९, भ्रमणध्वनी : ९२५०५३८५९८. |
| ३. | मे.डी.जे. एंटरप्राईजेस, १०९/११७, सी.पी. टँक रोड, २७, मोतीशॉं जैन बिल्डिंग, ३ रा मजला, माधवबाग मंदिर, मुंबई ४०० ००४. भ्रमणध्वनी : ८६००९७८०५३. |
| ४. | मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९ |
| ५. | मे. ए —झेड ऑफीस सप्लायर्स, २९/१५, सुभेदार हुसैन स्ट्रीट, रॉयपीठ, चेन्नई ६०० ०१४. भ्रमणध्वनी : ८१२२२२९९८८ |
| ६. | मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ७. | मे. न्यु सेंच्युरी फिलामेंट्स, सी-१, २१९/२, जी.आय.डी.सी., वाघोडीया, जि. वडोदरा ३९१ ७६० गुजरात. भ्रमणध्वनी : ९९७९९५३७८६. |
| ८. | मे. सिंत्रॉन पॉलिमर प्रा. लि., प्लॉट क्र.जी-२८०४, रोड १० ए, जी.आय.डी.सी., लोधीका, जि. राजकोट ३६००२७ गुजरात. भ्रमणध्वनी : ९९७९९५३७८६ |
| ९. | मे. युनिर्व्हसल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टँक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१ |

१७. कार्बन पेपर (Carbon Paper) :

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. महादेव स्टेशनरी, ३१०, डी विंग, कंकैया, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९७६९४३३३६३ |
| २. | मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९ |
| ३. | मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ४. | मे. जान्हवी इंम्पेक्स, २४३, २ मजला, फाखी मंझील, बाजारगेट मार्ग, फोट, मुंबई ४०० ००१. |
| ५. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| ६. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |
| ७. | मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४००.००१ भ्रमणध्वनी ९८२०८०११५९ |

१८. ड्रॉईंग पीन्स (बॉक्स वीथ २४ पिसेस)

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव व पत्ता |
|---|---|
| १. | मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१ भ्रमणध्वनी ९८२०८०११५९ |
| २. | मे.कृष्णा एंटरप्राईजेस,फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०. |
| ३. | मे. महादेव स्टेशनरी, ३१०, डी विंग, कंकैया, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९७६९४३३३६३ |
| ४. | मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२. |
| ५. | मे. शिवानी क्रिएशन, डी ६६, २ रा मजला, अमरवाडी, पहिली खत्तरगल्ली, सी.पी.टँक, मुंबई ४०० ००४ भ्रमणध्वनी : ९३२०४७१०८० |
| ६. | मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५ |

**********

आ.क्र. (91 मा-98
२७/०६/२०२५

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या
निवडणुकांकरीता मतदान केंद्र निश्चिती व
पुरवावयाच्या सोयी सुविधा

सत्यमेव जयते

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र


क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in

दिनांक - २६ जून, २०२५

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.३४/का-५,दि. २४ डिसेंबर, २००५.
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२०/का-५, दि. ५ डिसेंबर, २०११.
३) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.०९/प्रकल्प कक्ष,दि. २७ मे, २०१५.
४) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.०४ /का-५, दि. ९ मार्च, २०१६ व दि. २७ जून, २०२२.

## आदेश

भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद २४३ के, २४३ झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदतीत, निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणे तसेच या निवडणुकांचे नियंत्रण, संचालन व अधिक्षण करण्याची सांविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखालील निवडणूक नियम १४, मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २९ व त्याखालील नियमातील नियम, १८, महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ च्या नियम ८, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम ७, महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम ९ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाखालील संबंधित निवडणूक नियमातील तरतुदीनुसार प्रत्येक निवडणुकीपूर्वी मतदान केंद्रांची निश्चिती करुन त्याची यादी प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता लागू असलेल्या प्रभाग पध्दतीनुसार ( म्हणजेच एक सदस्यीय, द्विसदस्यीय, तीन सदस्यीय, चार सदस्यीय, थेट नगराध्यक्ष / सरपंच इत्यादीनुसार ) प्रत्येक प्रभागासाठी आवश्यक असलेली मतदान केंद्रे निश्चित करणे, अशा केंद्रांना जोडावयाच्या मतदारांची संख्या ठरविणे, सदर प्रक्रियेत राजकीय पक्षांना विश्वासात घेणे तसेच मतदारांना मतदानाचा हक्क बजावणे सुकर होण्याकरीता त्या ठिकाणी योग्य त्या सोयी सुविधा पुरविणे इत्यादी मुद्यांचा समावेश असलेले एकत्रित आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे.

आणि त्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए(४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ च्या कलम ९-ए(४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन तसेच यासंदर्भात यापूर्वी दिलेल्या संदर्भाधिन आदेश इत्यादीचे अधिक्रमण करुन राज्य निवडणूक आयोग खालील प्रमाणे सुधारीत आदेश देत आहे. :-

१) <u>मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या</u> -

i) स्थानिक स्वराज्य संस्थांचा मतदार संघ हा प्रभागात / जिल्हा परिषद निवडणूक विभाग (गट) / पंचायत समिती निर्वाचक गणामध्ये (गण) विभागलेला असतो व प्रत्येक प्रभाग हा भौगोलिकदृष्टया सलग भाग असतो. सबब, प्रत्येक ग्रामपंचायत, नगर परिषद, नगर पंचायत व महानगरपालिकेसाठी प्रत्येक प्रभागात व जिल्हा परिषद / पंचायत समितीसाठी प्रत्येक गावाकरीता किमान १ मतदान केंद्र असणे आवश्यक आहे.

ii) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक सदस्यीय / बहुसदस्यीय प्रभाग पध्दती यथास्थिती लागू असते. मतदारास द्यावयाच्या मतांच्या संख्येमध्ये वाढ झाल्यास त्याच्या मतदानाच्या कालावधीमध्ये वाढ होते. त्यामुळे मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची संख्या मर्यादित ठेवणे आवश्यक आहे.

iii) विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांना त्या-त्या वेळी लागू असलेल्या एक सदस्यीय / बहुसदस्यीय प्रभाग पध्दती अथवा अध्यक्ष / सरपंच थेट निवडणूक यानुसार मतदान केंद्रावर

खालीलप्रमाणे कमाल मतदार जोडण्यात यावेत.

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | प्रभाग पध्दती | मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची कमाल संख्या |
|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका | एक सदस्यीय | १००० ते १२०० |
| २ | इतर महानगरपालिका | एक सदस्यीय | १००० ते १२०० |
| | | द्विसदस्यीय | ९०० ते १००० |
| | | त्रिसदस्यीय | ८०० ते ९०० |
| | | चार सदस्यीय | ७०० ते ८०० |
| | | पाच सदस्यीय | ६०० ते ७०० |
| ३ | नगरपरिषद | एक सदस्यीय | १००० ते १२०० |
| | | एक सदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ९०० ते १००० |
| | | द्विसदस्यीय | ९०० ते १००० |
| | | द्विसदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ८०० ते ९०० |
| | | त्रिसदस्यीय | ७०० ते ८०० |
| | | त्रिसदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ६०० ते ७०० |
| ४ | नगरपंचायत | एक सदस्यीय | १००० ते १२०० |
| | | एक सदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ९०० ते १००० |
| ५ | जिल्हापरिषद / पंचायत समिती | एकत्र निवडणूक | ८०० ते ९०० |
| | | स्वतंत्र निवडणूक* | ९०० ते १००० |
| ६ | ग्रामपंचायत | बहुसदस्यीय | ८०० ते ९०० |
| | | बहुसदस्यीय (थेट सरपंचासह) | ७०० ते ८०० |
| * जिल्हा परिषद अथवा पंचायत समिती यापैकी एकाच पदाची निवडणूक असल्यास वर स्वतंत्र निवडणूक असे नमूद आहे त्यानुसार मतदार संख्या ठेवावी. | | | |
| टीप १ - पोटनिवडणूक असल्यास किती पदांची निवडणूक आहे त्यानुसार मतदार संख्या ठेवावी. | | | |
| टीप २ - दुर्गम भाग/विरळ लोकवस्ती अथवा विखुरलेल्या वाड्या, वस्त्या व तांडे यामध्ये कमी लोकसंख्येकरीता देखील मतदान केंद्र ठेवता येईल. | | | |
| टीप ३ - मतदान केंद्रास जोडावयाच्या कमाल आणि किमान संख्येमध्ये स्थानिक परिस्थिती व मागील निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार १० % कमी अथवा अधिक मतदार जोडता येतील. | | | |

iv) मागील निवडणुकांतील मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन अशा केंद्रांवर आवश्यकता असल्यास अतिरिक्त मतदान अधिकारी नेमावा.

२) <u>मतदान केंद्राचे ठिकाण निवडणे</u> –

i. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका साधारणत: प्रभागनिहाय किंवा गट / गणनिहाय होत असतात. त्यामुळे मतदान केंद्राचे ठिकाण निवडताना एका प्रभागातील किंवा गावातील मतदाराला २ कि.मी. पेक्षा जास्त प्रवास करावा लागू नये अशा रितीने मतदान केंद्राचे ठिकाण शक्यतो त्याच प्रभागात किंवा गावात असावे. मतदान केंद्राचे ठिकाण हे साधारणत: मतदारास सहजरित्या मिळू शकेल अशा मध्यवर्ती ठिकाणी असावे. परंतु दुर्गम भागात / विरळ लोकसंख्या / भौगोलिक कारणास्तव विखुरलेल्या वाड्या, वस्त्या व तांडे यामध्ये कमी मतदारांसाठी देखील मतदान केंद्र उभारण्याची गरज भासल्यास मतदान केंद्र उभारावे.

ii. नागरी / ग्रामीण क्षेत्रातील एखाद्या प्रभागात मतदान केंद्रासाठी योग्य जागा उपलब्ध नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत लगतच्या प्रभागात मतदान केंद्र ठेवता येईल, मात्र त्याकरीता यथास्थिती संबंधित महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेण्यात यावी.

iii. साधारणत: लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांकरीता मतदान करताना ज्या मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदार मतदान करतात त्याच इमारतीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी देखील मतदान केंद्र असावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सर्वसाधारणपणे तसेच गत निवडणुकीत झालेले मतदान विचारात घेऊन तसेच कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेऊन एकाच इमारतीमध्ये शक्यतो १० पेक्षा जास्त मतदान केंद्र ठेवण्यात येऊ नयेत.

iv. मतदान केंद्राचे ठिकाण निश्चित करताना शक्यतो मतदान केंद्राच्या बाहेर लोकांना रांगेत उभे राहण्यासाठी मोकळी जागा असावी. आवश्यकता भासल्यास मंडप टाकण्याची सोय असावी. तसेच मुख्य प्रवेशद्वार मोठे असावे.

v. मतदान केंद्र शक्यतो पक्क्या इमारतीत असावे व सदर इमारत शक्यतो शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा धर्मादाय संस्था यांच्या मालकीची असावी. जेणेकरुन, टेबल-खुर्च्या व इतर सुविधा पुरविणे सुलभ होऊ शकेल तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीनेदेखील सदर ठिकाण योग्य ठरेल. तसेच आवश्यकता भासल्यास खाजगी इमारतीत मतदान केंद्र स्थापन करण्याची स्थिती निर्माण झाल्यास संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांनी सर्व कारणमिमांसा जाणून घेऊन अशा मतदान केंद्रांना परवानगी द्यावी. मात्र सदर ठिकाण हे कोणत्याही राजकीय पक्ष किंवा उमेदवारांशी संबंधित नाही याची दक्षता घेण्यात यावी.

vi. मतदान केंद्राची जागा किमान २० चौ. मीटर असावी. तिथे मतदान केंद्राध्यक्ष, ४ मतदान अधिकारी, उमेदवारांचे मतदान प्रतिनिधी आणि बॅलेट युनिट व कंट्रोल युनिटच्या संख्येनुसार पुरेशी जागा व आडोसा असलेला मतदान कक्ष स्थापन करता येईल याची खात्री करावी.

vii. खाजगी इमारतीतील मतदान केंद्राबाबत, अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर त्या इमारतीत कोणत्याही पक्षाचे कार्यालय / उमेदवार राहत नसल्याची अथवा त्यांची मालकी नसल्याची खात्री करण्यात यावी. असल्यास मतदान केंद्र अन्य ठिकाणी हलविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

viii. मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास मतदान प्रक्रिया सुरु होण्याच्या किमान २४ तास अगोदर असे मतदान केंद्र संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ताब्यात घ्यावे.

ix. मतदान केंद्र शक्यतो तळमजल्यावर असावे. शहरी भागात ते अपवादात्मक परिस्थितीत पहिल्या मजल्यावर असल्यास तेथे उद्वाहनाची (लिफ्टची) सोय असावी. लिफ्टची व्यवस्था नसल्यास मतदारांना वरच्या मजल्यावरील मतदान केंद्रात जाण्याकरीता योग्य ती व्यवस्था करावी.

x. मतदान केंद्राचा १०० मीटर त्रिज्येचा परिघ हा मतदान केंद्राध्यक्षाच्या ताब्यात राहील. मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास सदर मतदान केंद्राच्या १०० मिटर त्रिज्येच्या परिघात खाजगी इमारतीचा मालक व त्याचे सुरक्षा रक्षक प्रवेश करणार नाहीत.

xi. कोणतेही मतदान केंद्र कोणत्याही परिस्थितीत पोलीस स्टेशन, रुग्णालय अथवा धार्मिक स्थळाच्या इमारतीत ठेवता येणार नाही.

३) <u>मतदान केंद्राच्या ठिकाणात अपवादात्मक परिस्थितीमध्ये बदल करणे</u> -

मतदान केंद्र निश्चित केल्यानंतर व त्याची यादी प्रसिध्द झाल्यानंतर जर काही कारणास्तव अपवादात्मक परिस्थितीत मतदान केंद्राचे स्थान किंवा इमारतीमध्ये बदल करावयाचा असल्यास संबंधित उमेदवारांशी विचार विनिमय करुन महानगरपालिकांच्या निवडणुकांबाबत संबंधित महानगरपालिका आयुक्त व इतर निवडणुकांच्याबाबतीत संबंधित जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील व तसा बदल केल्यानंतर त्याबाबत राज्य निवडणूक आयोगास अवगत करणे आवश्यक राहील.

४) <u>निवडणुकांकरीता कर्मचारी, जागा आणि वाहने अधिग्रहीत करणे</u> -

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-एसईसी.१०९५/३०६/डेस्क-३, दि.०२ मार्च, १९९५ अन्वये, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता कर्मचारी, जागा आणि वाहने अधिग्रहीत करण्याबाबत

सविस्तर आदेश काढले आहेत. या आदेशाचा अवलंब करुन निवडणुकांकरीता आवश्यक असलेल्या मतदान केंद्रांसाठी जागा उपलब्ध करुन घेता येतील.

५) <u>मतदान केंद्रावर पुरवावयाच्या सोयी सुविधा</u> -

i. **वीज पुरवठा** - मतदान केंद्र स्थित असलेल्या इमारतीमध्ये अखंडीत वीज पुरवठा व्यवस्था असावी. यासोबतच केंद्रावर पुरेसा उजेड व खेळती हवा, पंखे इ. सोयी सुविधा असतील याची खातरजमा करावी. मतदान केंद्र निश्चितीच्या तपासणीवेळी तेथील दिवे, पंखे, बटण, वायरिंग इ. ची तपासणी करून घ्यावी. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या क्षेत्रात लोड शेडिंग असणार नाही यासाठी संबंधित वीजपुरवठा यंत्रणेला ( उदा. MSEDCL / ADANI / RELIANCE / BEST इ.) आवश्यक आदेश देण्यात यावेत. तसेच आवश्यकतेनुसार जनरेटरचीही सोय ठेवावी.

ii. **पिण्याच्या पाण्याची व्यवस्था** - मतदान केंद्रावर स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय आहे याची खात्री करावी. यासोबतच पाणी पिण्याकरीता आवश्यकतेनुसार ग्लास, पाणी साठवण्याकरीता भांडे / मडके इ. सोय करण्यात यावी. नेमलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी विशेषत: उन्हाळयात २० लिटर पिण्याच्या पाण्याचे पॅकबंद कॅन शक्यतो उपलब्ध करुन द्यावेत.

iii. **शौचालयाची व्यवस्था** - मतदान केंद्र परिसरात स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये आहेत याची खात्री करावी. मतदानाच्या दिवशी प्रसाधनगृहाच्या स्वच्छतेबाबतही काळजी घ्यावी. तसेच तेथे पुरेशी पाण्याची व्यवस्था असावी.

iv. **मतदान केंद्रावर किमान आवश्यक फर्निचर** – मतदान केंद्रावर टेबल, खुर्च्या, पंखे, बेंच, मतदारांना रांगेत उभे राहण्याच्या जागेवर सावलीसाठी शेडस् इत्यादीची उपाययोजना करावी. मतदान केंद्रात जाणे-येणे कामी स्वतंत्र Entry-Exit असावे. जेथे अशी सोय नसेल तेथे बांबूची किंवा दोरीची बॅरीकेटिंग करून घ्यावी.

v. **रॅम्पची सुविधा** - वृध्द / दिव्यांग व्यक्तींना मतदान केंद्रावर जाणे सुकर व्हावे म्हणून रॅम्पची सोय असावी. कायमस्वरुपी रॅम्प नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी. तसेच व्हीलचेअरची देखील सुविधा असावी.

vi. **अपंग मतदारांकरीता तळ मजल्यावर केंद्र** - निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेली प्रारुप मतदार यादी हरकती व सूचना मागविणेसाठी प्रसिध्द करण्यात येते. याच कालावधीमध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अपंग मतदारांना आपली नावे देण्याचे आवाहन करण्यात यावे.

त्यांनी नाव देताना आपला मतदार यादी क्रमांक व मतदार क्रमांक नमूद करावा, अशी विनंती करावी जेणेकरुन मतदान केंद्र निश्चित करताना त्यांची गैरसोय होणार नाही.

जे अपंग मतदार आपलीं नावे देतील त्याबाबत संबंधित मतदार यादी तयार करणारे अधिकारी यांची जबाबदारी राहील की, त्या मतदारांची नावे तळमजल्यावरील मतदान केंद्रात येतील. जर एका इमारतीमध्ये तळमजल्यावर व वरच्या मजल्यावर मतदान केंद्रे असतील आणि जर अपंग मतदाराचे नाव वरच्या मजल्यावरील मतदान केंद्राच्या मतदार यादीत असेल तर ते तेथून कमी करुन तळमजल्यावरील मतदान केंद्राशी जोडून संबंधित मतदार यादीमध्ये पुरवणी म्हणून जोडण्यात यावे.

vii. **मा. उच्च न्यायालयाचे आदेश** - मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल झालेली जनहित याचिका क्र. ७८/२०१७ इंद्रधनु विरुध्द भारत सरकार व इतर मध्ये दि. १३ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या आदेशाची प्रत राज्य निवडणूक आयोगाने दि. २८ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना पाठविली आहे. त्यानुसार वरील (v) व (vi) मध्ये नमूद केलेल्या सुविधा सर्व मतदान केंद्रांवर परिणामकारकरित्या पुरविल्या जातील याची संबंधित महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी खात्री करुन घ्यावी. जर अशा सुविधा पुरविल्या गेल्या नाहीत अथवा त्यामध्ये त्रुटी राहिल्यास संबंधित निवडणूक अधिकारी यांना त्याबाबत व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल असे निर्देश मा. न्यायालयाने दिले आहेत.

viii. **ऋतुनिहाय करावयाच्या उपयायोजना -**

अ) **उन्हाळ्यातील उपाययोजना** - उन्हाळ्यात होणाऱ्या निवडणुका लक्षात घेता उष्माघाताचा त्रास होऊ नये म्हणून मतदान पथकासोबत आवश्यक ती औषधे, पिण्याचे पाणी, साखर-मीठाच्या पुड्या इ. वस्तू मतदान साहित्यासोबत द्याव्यात.

ब) **पावसाळ्यातील उपाययोजना** - पावसाळ्यात मतदान केंद्राबाबत तितकीच काळजी घेणे आवश्यक असून मतदान केंद्रात छपरातून पाणी गळणे वा चिखलसदृश्य परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यासाठी मतदान केंद्राच्या छपरावर आवश्यक असल्यास ताडपत्रीची व्यवस्था करण्यात यावी. मतदारांना रांगेत उभे राहण्याकरीता पावसापासून संरक्षण मिळेल अशी योग्य ती व्यवस्था करावी. याशिवाय दुषित पाण्यामुळे होणारे आजार इत्यादीबाबत घ्यावयाच्या काळजीबाबतच्या सूचनांना व्यापक प्रसिध्दी द्यावी. आवश्यकतेप्रमाणे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित करून घ्याव्यात व त्यांना क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत आवश्यक त्या

औषधांसह फिरतीवर ठेवावे. आवश्यकतेनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, १०८ क्रमांकाच्या फिरत्या रुग्णवाहिका यांनाही आवश्यक ते निर्देश देण्यात यावेत.

ix. **कुष्ठरोग्यांसाठी स्वतंत्र मतदान केंद्र** - मतदार संघात कुष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह /आश्रम असल्यास त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्र असण्यास हरकत नाही. उपलब्ध असल्यास त्यामध्ये काम करणारे अधिकारी/डॉक्टर्स/इतर कर्मचारी यांना मतदान केंद्राध्यक्ष/अधिकारी म्हणून नेमावे.

x. **असुरक्षित घटक** - असुरक्षित घटकांना मतदान प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेण्याकामी आवश्यकतेनुसार स्वतंत्र मतदान केंद्र निर्माण करण्यास हरकत नाही. अशा मतदान केंद्रांवर ५०० मतदारांपेक्षाही कमी मतदार असले तरी त्यास हरकत राहणार नाही. यासोबतच अशा मतदारांना जाणुन बुजून दूरवरच्या वा जिथे त्यांना मतदानास प्रतिबंध केला जाईल अशा विभागातील मतदान केंद्रास जोडले जाणार नाही याची काळजी घ्यावी.

मतदार संघात असणाऱ्या असुरक्षित / कमजोर मतदारांचा समूह / विभाग असल्यास तो शोधून काढणे, त्यांना जोडलेल्या मतदान केंद्रावर विशेष दक्षता घेणेबाबत भारत निवडणूक आयोगाकडून महत्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत, त्या सूचनांचे तंतोतंत पालन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही करण्यात यावे.

xi. **६० वर्षावरील नागरिक, अपंग, दिव्यांग, गरोदर स्त्रिया इ.करीता प्राधान्याने प्रवेश** - ६० वर्षावरील नागरिक / अपंग / दिव्यांग / गरोदर स्त्रिया / तान्ह्यामुलासह असणाऱ्या स्त्रिया यांना प्राधान्याने मतदान करू द्यावे. असे करीत असताना इतर मतदारांकडून सर्व प्रकारचे सहकार्य मिळविणेकामी राज्य निवडणूक आयोगाच्या सदरच्या सूचनांना योग्य प्रसिध्दी द्यावी. अशा मतदारांना मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी स्वत:चे किंवा कुटुंबियांचे वाहन वापरण्याची परवानगी असेल.

xii. **स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा** - शक्य असेल तेथे स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा ठेवाव्यात, जिथे शक्य नसेल तिथे रांगेतील एका पुरुषामागे २ स्त्रिया याप्रमाणे मतदान करू द्यावे. आवश्यकतेनुसार स्वतंत्र रांगांकरीता कमी खर्चाचे पार्टिशन तयार करून घ्यावे.

xiii. **परदानशीन स्त्रियांची ओळख पटवणे** - परदानशीन स्त्रिया किंवा ज्या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सरासरी जास्त असूनही केवळ संकोचामुळे स्त्रिया मतदानास येत नाहीत असे आढळत असल्याने प्रत्येक मतदान अधिकाऱ्यांच्या टीममध्ये एकतरी महिला अधिकारी/कर्मचारी असावी. परदानशीन स्त्रियांची ओळख पटविणेकामी अशा महिला कर्मचाऱ्यांचा उपयोग होईल.

xiv. **मतदार सहाय्य केंद्र** - मतदान केंद्राच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ "मतदार सहाय्य केंद्र" स्थापित करावे. त्यावरील कर्मचाऱ्यांकडे चिन्हांकित मतदार यादीची एक प्रत, मतदान केंद्राचा (मतदार अनुक्रमांक .... ते .... , मतदान केंद्र क्रमांक) तपशील असावा. जेणेकरून मतदारांना त्यांची नावे शोधण्यासाठी व संबंधित मतदान केंद्रात पाठविण्यासाठी सहाय्य करणे सुलभ होईल.

xv. **माहितीचे फलक** - मतदान केंद्रावर मतदारांना माहिती देणारे फलक योग्य ठिकाणी लावावेत. उदा. मतदान केंद्राचा मार्ग दर्शविणारा दिशादर्शक नकाशा, मतदान केंद्रावरील सोयींबद्दलची ( मतदार सहाय्य केंद्र शौचालय व पाणी व्यवस्था इ.) माहिती दर्शविणारे फलक.

६) <u>आदर्श मतदान केंद्राची निर्मिती</u> -

संबंधित महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी शक्यतोवर सर्व मतदान केंद्रांवर उपरोक्त किमान सोयी सुविधा राहतील याची दक्षता घ्यावी. आदर्श मतदान केंद्राची निर्मिती करण्याच्या दृष्टीने स्थानिक संस्कृती आणि गरजेनुसार मतदान केंद्रामध्ये अतिरिक्त आकर्षण, वैशिष्ट्ये जोडली जाऊ शकतात. पर्यावरण पूरक / पुनर्वापर योग्य व जीवाणुच्या सहाय्याने कुजविता येण्यासारख्या ( **बायोडिग्रेडेबल** ) साहित्याचा वापर करुन मतदान केंद्रे उभारावीत व शक्य तो, ती प्लास्टीकमुक्त ठेवावीत. पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाची तरतूद करावी. जास्तीत जास्त मतदान केंद्रे आदर्श मतदान केंद्रे ठेवण्याचा प्रयत्न करावा.

७) <u>महिला मतदान केंद्र</u> -

एखादे मतदान केंद्र ज्यावर महिला मतदारांची संख्या अधिक आहे अशा ठिकाणी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि सुरक्षा व्यवस्थेकरीता नियुक्त पोलीस इत्यादी सर्व अधिकारी / कर्मचारी म्हणून महिलांची नियुक्ती करता येईल.

८) मतदान <u>केंद्राच्या बाहेर पक्षाचे मतदार सहाय्य केंद्र उभारणे</u> -

i. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या १०० मीटर त्रिज्येच्या परिघात कोणत्याही पक्षाचे/प्रतिनिधीचे कार्यालय राहणार नाही. १०० मीटर त्रिज्येच्या परिघाच्या बाहेर प्रत्येक उमेदवारास केवळ १ मतदार सहाय्य केंद्र उभारता येईल. सदर केंद्रावर केवळ १ टेबल, २ खुर्च्या, सावलीसाठी मोठी छत्री/ताडपत्री/कापड टाकण्याची परवानगी असेल.

ii. अशा केंद्रावर ३ x ४.५ फुटापेक्षा जास्त लांबी-रुंदी नसणारा फलक लावू शकतील. त्यावर उमेदवाराचे नाव, चिन्ह, पक्षाची माहिती असेल. त्याव्यतिरिक्त कोणताही अनधिकृत फलक लावल्यास तो फलक काढून टाकण्यात यावा.

iii. मतदानाच्या दिवशी या केंद्रावर उमेदवाराचे नाव / चिन्ह / फोटो नसलेल्या केवळ मतदाराचा मतदान क्रमांक, मतदान केंद्राचा तपशील दर्शविणाऱ्या चिठ्ठया दिल्या जाऊ शकतील. परंतु त्यावर इतर कोणताही तपशील असणार नाही. उमेदवाराचे नाव / चिन्ह / फोटो असलेल्या मतदार चिठ्ठया मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत आणता येणार नाहीत.

iv. अशा सहाय्य केंद्रावर अनावश्यक गर्दी होणार नाही वा मतदारांना एखाद्या विशिष्ट उमेदवारास मत द्यावे म्हणून भरीस पाडले जाणार नाही याची दक्षता स्थानिक पोलिसांनी घ्यावी. प्राप्त तक्रारीवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करावी.

९) <u>मतदान केंद्रात मोबाईल / कॉर्डलेस फोन / वायरलेस फोन वापरण्यास प्रतिबंध</u> -

i. मतदान केंद्राच्या आत मतदारांना मोबाईल फोन नेण्यास बंदी आहे.

ii. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात व मतदान केंद्रावर कर्मचारीवृंद / पोलीसांव्यतिरिक्त कोणीही मोबाईल / कॉर्डलेस फोन / वायरलेस फोन वापरणार नाही.

iii. जर विविक्षित मतदारांनी जसे की वृध्द / अपंग / दिव्यांग इत्यादी मतदार यांनी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात मोबाईल फोन आणल्यास त्यांना असे मोबाईल फोन बंद (Switched Off) ठेवावे लागतील व मतदान केंद्राच्या आत जाण्याअगोदर बाहेर असलेल्या त्यांच्या सोबत असलेल्या व्यक्तीकडे सुपूर्द करावे लागतील.

iv. संबंधित महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी अथवा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये प्रामुख्याने मतदान केंद्राबाहेर मतदारांकरीता मोबाईल फोन जमा करण्यासाठी कक्ष स्थापन करावा.

v. अशा कक्षावर ठळक अक्षरात "मोबाईल फोन जमा कक्ष" असा फलक लावून तो कक्ष चालविण्याकरीता विश्वासू स्वयंसेवकांची नियुक्ती करावी.

vi. अशा कक्षामध्ये मोबाईल जमा करण्याकरीता किमान १० कप्पे असलेला पीजन होल बॉक्स उपलब्ध ठेवावा.

vii. सदर कक्षामध्ये सुरक्षिततेच्या कारणास्तव सीसीटिव्ही बसविण्यात यावा जेणेकरुन मतदार मोबाईल जमा करताना व परत नेताना दिसू शकेल. तसेच मोबाईल फोन ज्या ठिकाणी ठेवण्यात येत आहे त्याचेही चित्रिकरण होईल.

viii. सदर कक्षामध्ये प्राधिकृत अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेले व मतदान केंद्राचा शिक्का असलेले क्रमांकाचे टोकन ठेवावेत.

ix. मतदाराने मोबाईल फोन बंद (स्वीच ऑफ) करुन जमा केल्यानंतर त्याचा मोबाईल फोन संबंधित पीजन होलमध्ये ठेवून त्या क्रमांकाचे टोकन त्या मतदाराला देण्यात यावे.

x. मतदाराने मतदान करुन आल्यानंतर त्याच्याकडे असलेले टोकन सदर कक्षात जमा करावे.

xi. मतदाराने टोकन जमा केल्यानंतर त्या टोकन नंबरवर असलेला मोबाईल फोन मतदारास परत करण्यात यावा व ते टोकन पुन्हा त्याच क्रमांकाच्या पीजन होल मध्ये ठेवण्यात यावे.

xii. संबंधित महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी अथवा निवडणूक निर्णय अधिकारी यांना स्थानिक परिस्थिती, कायदा व सुव्यवस्था व स्वयंसेवकांची उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये प्रामुख्याने मतदान केंद्राबाहेर मतदारांकरीता मोबाईल फोन जमा करण्यासाठी कक्ष स्थापन करणे योग्य होईल किंवा कसे याबाबत निर्णय घेता येईल.

xiii. यासंदर्भात भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. 464/INST/EPS/2025/L&O दि. २३ मे, २०२५ चे निर्देश विचारात घ्यावेत.

१०) <u>मतदान केंद्राच्या ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना व सुरक्षा व्यवस्था इत्यादी</u> -

i. तहसिलदार / गट विकास अधिकारी / पोलीस यंत्रणा, महानगरपालिका क्षेत्रात विभाग अधिकारी (Ward Officer) यांनी कमकुवत गट शोधून काढण्यात मदत करावी. अशा विभागात असुरक्षितता निर्माण करणाऱ्या गुंड प्रवृत्तींच्या व्यक्तींविरुध्द पोलीस यंत्रणेने प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ करावी.

ii. अशा विभागात संबंधित मतदारांमध्ये विश्वास निर्माण होण्याकामी क्षेत्रीय अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधिकारी यासारखे अधिकारी यांनी वारंवार भेटी द्याव्यात व तेथील प्रतिष्ठित व्यक्तींशी संपर्क साधून होणाऱ्या घडामोडींचा आढावा घ्यावा.

iii. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षांना अशा विभागातून होणाऱ्या मतदानाच्या आकडेवारीवर विशेष लक्ष देण्याचे सूचित करावे.

iv. उपरोक्त सूचनांचे पालन काटेकोरपणे केले जाईल याची जबाबदारी महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका आयुक्त यांची राहील. तसेच महानगरपालिका वगळता इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सदर जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

११) <u>मतदान केंद्रांची यादी अंतिम करणे</u> -

मतदान केंद्रांची यादी राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकापूर्वी अंतिम होणे आवश्यक राहील. अंतिम मतदान केंद्राची यादी तयार करण्यापूर्वी सर्व संबंधित जिल्हाधिकारी,

महानगरपालिका आयुक्त यांनी मतदान केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करावी. उपरोक्त सूचनांप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध आहेत वा कसे? याची तपासणी करून आवश्यक त्या सोयी सुविधा निर्माण करून घ्याव्यात.

प्रारुप मतदान केंद्रांच्या यादीस संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात तात्काळ ( संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार ) प्रसिध्दी द्यावी. त्याची एक प्रत राष्ट्रीय व राज्यस्तरावरील मान्यताप्राप्त पक्षांना द्यावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील राजकीय पक्ष यांची बैठक आयोजित करून त्यांना ती यादी मोफत द्यावी. त्यांचे आक्षेप लेखी नोंदवून आवश्यक ते बदल (आवश्यक तेथे प्रत्यक्ष पाहणी करून) समाविष्ट करून अंतिम यादी तयार करावी.

अंतिम मतदान केंद्रांच्या यादीनुसार मतदान केंद्र दर्शविणारा नकाशा तसेच त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचा नकाशा, वाहतूकविषयक आराखडा (Transport Plan) तसेच मतदान केंद्राच्या जवळचे पोलीस स्टेशन, मतदान केंद्रावरील दूरध्वनी, संपर्क अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी यांचा एक संपर्क आराखडा (Communication Plan) तयार करावा. त्यात सर्व संबंधितांचे दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नं.), ई-मेल ॲड्रेस यांचा समावेश असावा. यामुळे त्यांचेकडील वॉटस् ॲप, एसएमएस, ई-मेल याद्वारे सर्व संबंधितांशी जलदरित्या संपर्क साधता येईल.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकामी राज्य निवडणूक आयोगाकडून नेमण्यात येणाऱ्या निवडणूक निरीक्षकांना मतदान केंद्रांच्या यादीसह संपर्क आराखडा टिप्पणीसह पुरवावेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

२६.०६.२०२४

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत.